


दैनिक

अचूक वेध,अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com

**आतील पानात**

- सरपंचावर सहकुटुंब रोजगार हमीच्या कामावर जाण्याची वेळ...
- मराठवाडा मुक्ती संग्राम दिन...
- ओबीसी संघटनेची बैठक ; तहसील कार्यालयांवर मोर्चाचा निर्धार...

वर्ष : ०५ | अंक : ३३, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, बुधवार, दि.१७ सप्टेंबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका कधी होणार?

### सर्वोच्च न्यायालयाने सांगितली अखेरची तारीख



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१६, मुंबई :** राज्यात गेल्या काही काळापासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडलेल्या आहेत. याबाबत आता महत्त्वाची माहिती समोर आली आहे. आज सर्वोच्च न्यायालयात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांवरील याचिकेवर सुनावणी पार पडली. या सुनावणीत सर्वोच्च न्यायालयाने ३१ जानेवारी २०२६ पर्यंत निवडणुका घ्या असा स्पष्ट आदेश दिला आहे.

**३१ जानेवारी २०२६ पर्यंत या निवडणुका घ्या, कोर्टाचा आदेश**

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत आज सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडली. यावेळी न्यायालयाने राज्य निवडणूक आयोगाला निवडणुका घेण्यासाठी अखेरची तारीख सांगितली आहे. ३१ जानेवारी २०२६ पर्यंत या निवडणुका घ्या असं कोर्टाने म्हटलं आहे. त्यामुळे राज्यातील जिल्हा परिषदा, महानगरपालिका, पंचायत समितीच्या निवडणुका जानेवारी अखेरपर्यंत पार पडणार आहेत.

**याआधी दिली होती ४ महिन्यांची मुदत !**

याआधी मे महिन्यात सर्वोच्च न्यायालयाने ४ महिन्यात या निवडणुका घेण्याचा आदेश दिला होता. मात्र पावसामुळे आणि इतर कारणामुळे निवडणुका होऊ शकलेल्या नाहीत. ओबीसी आरक्षणाच्या अंमलबजावणीशी संबंधित निकालामुळे २०२२ पासून या निवडणुका रखडलेल्या आहेत. मात्र आता कोर्टाने निवडणूक घेण्याचे अंतिम आदेश दिले आहेत. त्यामुळे आता पुढील ४ महिन्यांमध्ये या निवडणुका पार पडणार आहेत.

**कोर्टाची महत्त्वाची सूचना !**

कोर्टाने आज निवडणुकीसाठी स्पष्ट वेळापत्रक घालून दिलं आहे. याआधी दिलेली चार महिन्यांची दिलेली मुदत संपल्यावर अर्ज दाखल केल्याने कोर्टाने नाराजी व्यक्त केली. निवडणूक आयोगाने एतच् कमी, बोर्ड परीक्षा आणि स्टाफ कमी आहे अस कारण आज कोर्टाला सांगितलं, मात्र कोर्टाने बोर्ड परीक्षेचं कारण फेटाळून लावलं तर बाकी दोन कारणासाठी सूचना दिल्या आहेत. प्रभाग रचना ३१ ऑक्टबर २०२५ पर्यंत पूर्ण झाल्याचं पाहिजे अस कोर्टाने सांगितलं आहे. तसेच नोव्हेंबर महिन्यात एतच् पूर्तता झाली पाहिजे असंही कोर्टाने म्हटलं आहे.

**३४ जिल्हा परिषदांमधील अध्यक्षपदाचं आरक्षण जाहीर**

काही दिवसांपूर्वी निवडणूक आयोगाने ३४ जिल्हा परिषदांमधील अध्यक्षपदाचं आरक्षण जाहीर केलं होतं. रायगड, सिंधुदुर्ग, नाशिक, जळगाव, पुणे, छत्रपती संभाजीनगर, बुलढाणा, यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये सर्वसाधारण गटासाठी आरक्षण जाहीर झाले आहे. तर ठाणे, कोल्हापूर, सांगली, धाराशिव, लातूर, अमरावती, गोंदिया, गडचिरोली या जिल्हा परिषदांमध्ये सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी आरक्षण जाहीर झाले आहे. सोलापूर, हिंगोली, नागपूर, भंडारा या ठिकाणी पुरुष मागस प्रवर्गासाठी आरक्षण तर रत्नागिरी, धुळे, सातारा, जालना, नांदेड या ठिकाणी महिला मागस प्रवर्गासाठी आरक्षण असणार आहे.

## अनैतिक संबंधातून वाद, तरुणाने विवाहित प्रेयसीच्या नवऱ्याचा काटा काढला

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१६, नाशिक :** इंदिरानगर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील गरवारे बस थांबा येथे अनैतिक संबंधांतील वादातून झालेल्या खून प्रकरणातील संशयितांना तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे.

शनिवारी नाशिकमध्ये घडलेल्या या घटनेत संतोष उर्फ छोटू काळे, वय ३८, रा. लेखानगर, याचा दगडाने ठेचून निर्घृण खून करण्यात आला होता. या प्रकरणी इंदिरानगर पोलिसांनी मृताची पत्नी पार्वती काळे, ३०, तिचा प्रियकर प्रफुल्ल कांबळे, ३६, योगेश बाळासाहेब जाधव, २३, तसेच एका अल्पवयीन तरुणाला अटक करण्यात आली आहे. या संशयितांना रविवारी न्यायालयात हजर करण्यात आले असता न्यायालयाने तिघा संशयितांना १७ सप्टेंबरपर्यंत तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली. त्यातील अल्पवयीनाची बालसुधारगृहात रवानगी करण्यात आली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पार्वती काळे हिचे प्रफुल्ल कांबळे याच्याशी अनैतिक संबंध होते. त्यावरून पती-पत्नीमध्ये वारंवार वाद होत होते. घटनेच्या दोन दिवस आधीच संतोष व पार्वतीमध्ये तीव्र भांडण झाले होते. त्यामुळे संतोषचा अडथळा कायमचा दूर करण्याच्या उद्देशाने पार्वती व प्रफुल्ल यांनी कट रचला. त्यात योगेश जाधव व एका अल्पवयीन मुलानेही साथ दिली.

# ...तर मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र देऊ नये

## ओबीसी उपसमितीच्या बैठकीतली आतली बातमी

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१६, मुंबई :** राज्यात मराठा विरुद्ध ओबीसी आरक्षणाचा संघर्ष चांगलाच पेटला असताना, ओबीसी उपसमितीच्या बैठकीत महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. कुणबी प्रमाणपत्र वाटप करताना कोणत्याही खोडतोड झालेल्या किंवा चुकीच्या पुराव्यांना ग्राह्य धरु नये, असे स्पष्ट निर्देश ओबीसी उपसमितीच्या बैठकीत देण्यात आले. तर चुकीच्या आणि बनावट पुराव्यांच्या आधारे देखील मराठा समाजाला कुणबी सर्टिफिकेट देण्याचा प्रयत्न होऊ नये, असेही निर्देश देण्यात आले. ओबीसी आरक्षण धोक्यात येऊ नये, अशी भूमिका उपसमितीने स्पष्ट केली आहे.

ओबीसी उपसमितीचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखालील या बैठकीत महत्त्वाची चर्चा झाली. बावनकुळे यांनी सांगितले की, 'राज्य सरकारकडे सादर



होणाऱ्या कागदपत्रांमध्ये ओव्हरराईटिंग किंवा खाडाखोड असल्यास कुणबी प्रमाणपत्राची मागणी नक्कीच फेटाळण्यात यावी,'

बैठकीदरम्यान पुराव्यांवर खोडतोड कशी होते, याचे नमुने देखील दाखविण्यात आले. त्यामुळे भविष्यात मराठा समाजाला कुणबी सर्टिफिकेट देताना काटेकोर छाननी केली जावी, खोट्या पुराव्यांच्या आधारे सर्टिफिकेट देऊ नये, असे उपसमितीने अधोरेखित केले आहे.

बैठकीत ओबीसींच्या विविध प्रश्नांवरही चर्चा झाली. राज्यात २२ ओबीसी महामंडळे असून त्यांना आवश्यक निधी मिळाला पाहिजे, अशी ठाम मागणी करण्यात आली. ओबीसी मंत्रालयाला २,९०० कोटी रुपये आणि महामंडळांना ३,२०० कोटी रुपये मिळावे, याबाबत पुरवणी मागणी सादर करण्याचा निर्णय घेण्यात आला.

त्याचप्रमाणे, ओबीसींसाठी असलेल्या विशेष शिष्यवृत्ती योजना बंद पडू नयेत, प्रत्येक जिल्ह्यात हॉस्टेल उपलब्ध व्हावीत आणि विभागीय कार्यालये स्थापन करण्यात यावीत, अशा मागण्या पुढे मांडण्यात आल्या.

# श्री तुळजाभवानी देवी शारदीय नवरात्र महोत्सवाला

## महाराष्ट्राच्या प्रमुख महोत्सवाचा दर्जा- पर्यटन मंत्री शंभूराज देसाई

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१६, धाराशिव :** श्री तुळजाभवानी देवी शारदीय नवरात्र महोत्सवाला राज्यातील प्रमुख महोत्सवाचा प्रतिष्ठित दर्जा प्रदान केला असून हा भव्य महोत्सव २२ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर, २०२५ या कालावधीत, घटस्थापनेपासून विजयादशमीपर्यंत, धाराशिव (उस्मनाबाद) जिल्ह्यातील तुळजापूर येथे साजरा होईल. या महोत्सवा दरम्यान स्थानिक लोककला, गोंधळी गीत, भारुड, जाखडी नृत्य यांसारख्या पारंपरिक कलांचे सादरीकरण होईल. गोंधळ, भजन आणि कीर्तन यांसारख्या धार्मिक-सांस्कृतिक स्पर्धा आयोजित केल्या जातील, अशी माहिती पर्यटनमंत्री शंभूराज देसाई यांनी दिली.

मंत्री श्री.देसाई म्हणाले की, महाराष्ट्रातील साडेतीन शक्तीपीठांपैकी एक असलेल्या श्री तुळजाभवानी माता अंबाबाईच्या प्राचीन मंदिरासाठी तुळजापूर हे पवित्र तीर्थक्षेत्र देशभर प्रसिद्ध आहे. या दहा दिवसीय महोत्सवात महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगणा आणि देशाच्या विविध भागांतून सुमारे ५० लाख भाविक श्री तुळजाभवानीच्या दर्शनासाठी तुळजापुरात दाखल होतात.



या कालावधीत तुळजापूर शहर धार्मिक उत्साह, सांस्कृतिक वैभव आणि सामाजिक एकतेच्या रंगांनी उजळून निघते. या महोत्सवा दरम्यान स्थानिक लोककलासह राष्ट्रीय आणि प्रादेशिक स्तरावरील ख्यातनाम कलाकारांचे सांस्कृतिक कार्यक्रम या उत्सवाला विशेष रंगत आणतील. नवरात्र थीमवर आधारित ३०० ड्रोनद्वारे साकारलेला भव्य लाईट शो या महोत्सवाचे प्रमुख आकर्षण ठरेल.

महाराष्ट्र पर्यटन संचालनालयाच्या अधिकृत संकेतस्थळ आणि युट्यूब चॅनेलवर, महोत्सवाचे थेट प्रक्षेपण उपलब्ध असेल, ज्यामुळे देश-विदेशातील भाविक आणि पर्यटक या उत्सवाचा आनंद घेऊ शकतील. याशिवाय, जबाबदार आणि शाश्वत पर्यटनाला प्रोत्साहन देण्यासाठी व्याख्याने, चित्रकला स्पर्धा आणि मॅरेथॉन यांचे आयोजन करण्यात येईल. फॅम टूरचे आयोजन, पर्यटन विषयक कॉन्क्लेव्ह, फ ेअर इव्हेंटचे आयोजन करण्यात येईल. या महोत्सवामुळे तुळजापूर परिसरातील नळदुर्ग किल्ला, तेर येथील संत गोरोबा काकांचे मंदिर, येरमाळा येथील येडेश्वरी मंदिर आणि परांडा किल्ला यांसारख्या धार्मिक आणि ऐतिहासिक स्थळांना भेट देणाऱ्या पर्यटकांच्या संख्येत लक्षणीय वाढ होईल. यामुळे स्थानिक पर्यटनाला गती मिळेल आणि परिसरातील अर्थव्यवस्थेला चालना मिळेल.

**स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळेल : प्रधान सचिव डॉ. अतुल पाटणे**

प्रधान सचिव डॉ.अतुल पाटणे म्हणाले की, श्री तुळजाभवानी देवी शारदीय नवरात्र महोत्सवाला प्रमुख महोत्सवाचा दर्जा देण्याचा हा निर्णय ऐतिहासिक आहे. यामुळे पर्यटनवृद्धीचे उद्दिष्ट साध्य होईल, स्थानिक कलाकारांना प्रोत्साहन मिळेल आणि महाराष्ट्राची धार्मिक व सांस्कृतिक ओळख अधिक दृढ होईल. हा महोत्सव स्थानिक अर्थव्यवस्थेला बळकटी देण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरेल.

**महोत्सव महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाचा आणि धार्मिक श्रद्धेचा संगम ठरेल - पर्यटन संचालक डॉ.बी.एन.पाटील**

पर्यटन संचालक डॉ. बी. एन. पाटील म्हणाले की, श्री तुळजाभवानी देवी शारदीय नवरात्र महोत्सवाला प्रमुख महोत्सवाचा दर्जा मिळाल्याने महाराष्ट्राच्या पर्यटन क्षेत्राला नवीन दिशा मिळेल. हा महोत्सव केवळ धार्मिक नाही, तर महाराष्ट्राच्या समृद्ध लोककला आणि सांस्कृतिक वारशाला राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर नेण्याचे प्रभावी व्यासपीठ ठरेल. म्हैसूर दसरा महोत्सवाप्रमाणे, या महोत्सवाची प्रसिद्धी मोठ्या प्रमाणात केली जाईल, ज्यामुळे अधिकाधिक पर्यटक आकर्षित होतील.

# मोडकळीस आलेल्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांना मिळताहेत शिक्षणाचे धडे; प्रशासनाचे दुर्लक्ष

**अक्षराज : उध्दव आटोळे**

**दि.१६, लोणार (बुलडाणा) :** लोणार तालुक्यातील तांबोळा येथे जिल्हा परिषद शाळेची दयनीय अवस्था, इथे विद्यार्थ्यांना मूलभूत सुविधांचा अभाव इमारतीची पडझड आणि शिक्षकाची कमतरता यासारख्या समस्या भेडसावत आहे.

यामुळे विद्यार्थ्यांचे शिक्षण धोक्यात आले आहे. यासारख्या समस्यामुळे विद्यार्थ्यांना इतर ठिकाणी शिक्षण घेणे भाग पडत आहे.जिल्हा परिषद शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची सोय नाही त्याचबरोबर स्वच्छतागृहे बांधलेली असली तरी ती पाणी नसल्यामुळे फक्त नावालाच आहेत. जिल्हा परिषद शाळेच्या इमारतीची अवस्था ही गंभीर आहे भिंतींना तढे गेले आहेत पत्रे केव्हाही कोसळण्याचा धोका असल्यामुळे विद्यार्थी असुरक्षित वातावरणात शिक्षण घेत आहेत.

तीन खोल्यांची अवस्था ही अत्यंत दयनीय असल्याने एक ते पाच वर्ग असतानाही केवळ दोनच खुल्या असल्या मुळे पाच वर्गांना दोनच खोल्यांमध्ये बसविल्या जात आहे.सोबतच विद्यार्थी संख्येवर शिक्षकांची संख्या अवलंबून असल्यामुळे एक ते पाच पर्यंत वर्ग असतानाही केवळ तीनच शिक्षकांना पाच वर्गांना शिकावे लागत आहे त्यामुळे विद्यार्थ्यांना योग्य शिक्षण मिळत नाही.

या सर्व कारणांमुळे जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांना भौतिक सुविधा पासून वंचित असल्यामुळे शाळेची दयनीय व्यवस्था झाली आहे. शिक्षक व शाळा व्यवस्थापन समितीने ग्रामपंचायत प्रशासन व पंचायत समितीकडे अनेक वेळा दुरुस्तीची मागणी करूनही सुविधा देण्यास दिरंगाई करण्यात येत आहे संबंधित अधिकारी एकमेकांकडे बोट दाखवून जबाबदारी डावण्याचा प्रयत्न करीत एकीकडे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील मुलांना सुख सुविधा देण्यासाठी कटिबद्ध आहेत असे सांगत असताना तसेच शाळा डिजिटल व स्मार्ट होत असताना दुसरीकडे अशी वाईट अवस्था दिसून येत आहे,ही मोठी शोकांतिका असल्याचे नागरिकांनी व्यक्त केली आहे.

शाळेत विद्यार्थ्यांना पिण्याचे पाणी नाही,पावसामध्ये




गळणारे किचन शेडचे व्यवस्था,शौचालयाची दुरावस्था,नादुरुस्त व अपुरा विद्युत पुरवठा, कमी उंचीची असलेले शाळेला कंपाउंड अशा भौतिक सुविधा पासून विद्यार्थ्यांना वंचित रहावे लागत आहे.

शाळेचा शैक्षणिक दर्जा चांगला असताना केवळ भौतिक सुविधा नसल्यामुळे अनेक पालक आपल्या मुलांना खाजगी शाळेत पाठवत असल्याचे चित्र आहे. शाळेच्या ग्राउंड मध्ये दारूच्या बाटल्या आढळल्याने शाळा सुटल्यानंतर मध्यपिनचाही वावर असल्याचे दिसून येत आहे प्रशासनाने आकडे लक्ष देणार का असा प्रश्न उपस्थित होत आहे. पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी यांनी शाळेचे पाहणी करण्यासाठी मागणी विद्यार्थी व पालक यांनी केलेली आहे.

वरील सर्व समस्यांकडे ग्रामपंचायत व पंचायत समितीने शाळेच्या भौतिक सुविधांसाठी व दुरुस्तीच्या मागणी करणे होत असल्याने प्रशासनाने लवकरात लवकर सुविधा उपलब्ध करून द्याव्यात यासाठी शाळा समिती व गावकऱ्यांनी पंचायत समितीला निवेदन दिली आहे.

या निवेदनावर शाळा समिती अध्यक्ष संतोष खादंरकर, तांटामुक्ती अध्यक्ष लक्ष्मण आटोळे, ग्रामपंचायत सदस्य राहुल मोरे, माजी सरपंच मधुकर राठोड, जनार्दन राठोड, प्रकाश आटोळे, उद्धव आटोळे यांच्यासह शाळा समिती सदस्य करीम चौधरी, गणेश राऊत, दिपक आटोळे, गणेश बोरुडे, उमेश राठोड याच्यासाठी तरी ग्रामस्थांनी सही केलेले निवेदन गटविकास अधिकारी यांना देण्यात आले.




## ११ वर्षात भाजपला पहिलाच धक्का?

राजकारणात कधी काय होईल हे सांगता येत नाही. कधीकधी एखाद्या नेत्याला अनपेक्षितपणे मंत्रिपद मिळते तर कधी एखाद्या नेत्याला मंत्रिपदाची खुर्ची खाली करावी लागते. सध्या मात्र मेघालयात असाच काहीसा प्रकार समोर आला आहे. गेल्या ११ वर्षांत मेघालयमध्ये जे घडलं नाही, ते आता पाहायला मिळत आहे. इथे मंत्री धडाधड राजीनामे देत आहेत. या राजीनाम्यांचं नेमकं कारण काय? असं आता विचारलं जात आहे.

**मेघालयमध्ये नेमकं काय घडत आहे?**

मेघालयमध्ये राजकीय घडामोडींना चांगलाच वेग आला आहे. इथे भाजपा सत्तेत सहभागी असलेल्या युतीमधील १२ पैकी ८ मंत्र्यांनी आपल्या पदाचे राजीनामे दिले आहेत. राजीनामा देणाऱ्या मंत्र्यांमध्ये एनपीपी, यूडीपी, एचएसपीडीपी आणि बीजेपी पक्षाच्या मंत्र्यांचा समावेश आहे. यात एनपीपीचे अम्पारीन लिंगदोह, कॉमिंगोन यम्बोन आणि रक्षम ए. संगमा यांचा तसेच यूडीपी पक्षाचे अबू ताहीर मंडल, यूडीपीचे पॉल लिंगदोह आणि किरमेन शायला, एचएसपीडीपी पक्षाचे शकलियार वारजरी आणि भाजपाचे के ए एल हेक यांचा समावेश आहे. मेघालयात मंत्रिमंडळ विस्तार होत असल्याने या मंत्र्यांनी आपल्या पदाचे राजीनामे दिले आहेत.

**एकूण ८ मंत्र्यांचे राजीनामे !**

मेघालयमध्ये नॅशनल पिपल्स पार्टीचे सरकार आहे. या सरकारचे नेतृत्व कोनराड संगमा यांच्याकडे आहे. संगमा यांच्या सरकारमध्ये अन्य पक्षांचाही समावेश असून या सर्व पक्षांच्या युतीला मेघालय डेमोक्रॅटिक अलायन्स असे म्हटले जाते. २०२३ सालची निवडणूक झाल्यानंतर ही युती तयार झाली होती. एकूण साठ जागांसाठी २०२३ सालची ही निवडणूक पार पडली होती. संगमा यांच्या सरकारमध्ये एकूण १२ मंत्री होते. आता यातील ८ मंत्र्यांनी राजीनामे दिले आहेत.

**राजीनामा देण्याचे नेमके कारण काय?**

अगोदरच उल्लेख केल्याप्रमाणे

मेघालयच्या सरकारचा मंत्रिमंडळ विस्तार होणार आहे. त्यामुळे या विस्ताराअंतर्गत काही नेत्यांना मंत्रिपद दिले जाणार आहे. युतीतील सर्वच पक्षांना प्रतिनिधीत्त्व मिळावे आणि युती अबाधित राहावी यासाठी हा मंत्रिमंडळ विस्ताराचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे आता ज्या मंत्र्यांनी राजीनामे दिलेले आहेत. त्यांचे खाते नव्या नेत्याला दिले जाईल.

## कोपरखैरणे विभागात अनधिकृत बांधकामावर धडक कारवाई



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१५, नवी मुंबई :** महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नोटीस देऊन ही संबधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे अनधिकृत बांधकामाविरोधात नवी मुंबई महानगरपालिका विभागामार्फत मा. आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त (२) डॉ. राहुल गेठे व उप आयुक्त (अतिक्रमण) डॉ. कैलास गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने कोपरखैरणे विभागात निष्कासनाची कारवाई केली.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील कोपरखैरणे विभाग अंतर्गत संदीप जनार्दन पाटील भूखंड क्रमांक २५, सेक्टर ५, कोपरखैरणे, नवी मुंबई. यांच्या बांधकामास महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ मधील कलम ५४ अन्वये दिनांक १५-०१-२०२५ रोजी नोटीस बजावण्यात आली होती. सदर बांधकामावर निष्कासनाची अंशतः तोडक कार्यवाही करण्यात आली. व रु २५,०००/- असा दंड वसूल करण्यात आला आहे.

# गणितातील पाढे !




मायमराठी बरोबर गणितही पहिलीपासूनच अभ्यासक्रमात असल्यामुळे गुरुजींनी शून्यापासून ते शंभर पर्यंत उजळणी लिहायला वाचायला शिकवली. मात्र हिशोबासाठी आणि गणितातील गुणाकार,भागाकार शिकायला पाढे पदरात पडले. ते तिसरी चौथीच्या वर्गात. पाढे म्हणजे अंगावर काटे आणणारा विषय. मुळातच गणित विषय गंभीर. वास्तविक पाहता गणिताशिवाय जीवनात पाणी हालत नाही. पण काय कुणास ठाऊक गणित विषय म्हटला की, डोक्याला मुंग्या यायच्या. ते आकडे आणि पाढे,गणिताच्या नावे पोरं बोट मोडेअशी स्थिती होती.अर्ध्यापेक्षा जास्त, तेवढेच काय अजून त्याहीपेक्षा जास्त म्हणजे ऐंशी ते पंच्या ऐंशी टक्के आम्हा पोरांना गणिताची भीती वाटायची.काही वगळता हुशार मित्र होतेच,मात्र गणिताविषयाला घाबरणारा आमचा लॉट जास्त होता.

गणितातील गुणाकार,भागाकार उदाहरणे शिकवायला सुरुवात झाली की पाढे आलेच म्हणून समजा. त्या पाढ्याशिवाय गणिताचं जणू पाणच हलत नव्हतं.त्यात गुरुजींनी आमच्याभोवती पाढे तोंडपाठ करण्यासाठी तगादा लावलेला असायचा. आम्ही गणितात,पाढ्यात तरबेज व्हावं म्हणून गुरुजी त्यासाठी प्रयत्न करायचे परंतु, आमचं डोकं तर तेवढे चालायला हवं ना...!बे एक बे चे पाढा पाठ झाला.त्यांनतर तीन, चारचा पाठ झाल्यावर पाचचा पाढा म्हणायला सोपा जायचं,कारण पाच, दहा,पंधरा वीस हे पाचच्या पटीतील म्हणणं सोपं जायचं. मात्र सहा सात आठ नऊ यामध्ये फजिती व्हायची. डोक्याला हात लावू-लावू बसायचो. उजळणीचे पुस्तक डोक्याजवळ घेऊन झोपायचो. उठता बसता पाढेच पाढे..! घरी बाबा समोर पाढ्याचा काढला तर म्हणायचे,आमच्या काळात तर निमकी, पावकी,दीडकी होती. अरे देवा!मग काय गप्प बसायचो.तेव्हा अजून डोक्याला ताप...! त्या काळात शिकले बाबा शिकले.मग काय, आपण का नाही? म्हणून घ्या रफ कागद आणि लिहा त्यावर पाच वेळेस,पाटीवर लिहा पाच वेळेस असा हा आमचा नित्यनेम चालू झाला. मित्र,भाऊच्या मदतीने त्याला सांगायचो, मी म्हणतो, बघ चुकते का? तर चुकले कि म्हणायचे, अरे थांब! सहा-साते पंचेचाळीस नाही रे ! सहा साते बेचाळीस होतात रे. अरे बापरे बाप ! कारण मागील पाचव्या पाढ्यात पाच नवे पंचेचाळीस होते.आणि तेच अचानक मध्येच चालू व्हायचं. पुन्हा म्हणायचो.या आकड्यांच्या बाजारात डोकं पूर्ण गांगरून जायचं.बरं! गंमत अशी व्हायची कि,गुरुजी एकदम विचारायचे सांग, सहा आठे किती?तेव्हा तर परत गोंधळ उडून जाण्याचा जे लागोपाठ पाठ नाही ते एकदम कसे सहा आठ हे कसे येईल? शेवटी काय? कसंतरी घोंकंपट्टी करून करून पाढे पाठ केलेच नऊ पर्यंत...!त्यानंतर दहा चा पाढा पाचासारखाच होता दहाच्या म्हटलं कि पाढा पाठ,दहा एके दहा,दहा दुणे वीस,तीस, चाळीस, पन्नास ते शंभरपर्यंत म्हटलं की, झालं समाधान.पाचचा पाढा अन दहाचा पाढा या दोन बिचाऱ्यांनी फारसा त्रास दिला नाही. तेवढी धन्यता मानायचो.

वर्गात गुरुजींनी उभे राहून दोनच्या पाढ्यापासून एका-एकाला एक-एक पाढा म्हणायचे सांगितले की,ज्याच्या वाट्यावर दोन, पाच,अन दहाचा पाढा आला कि, तो खुश व्हायचा. मात्र आमचं नशीब कसलं बलवत्तर? नेमकं माझ्या वाट्याला सात किंवा नऊचा यायचा. म्हणजे पाढ्यालाही माझी पाठ सोडायचीच नव्हती म्हणायची बहुतेक.मग काय!उभ राहायचो.डोळे मिटवायचो.मनातल्या मनात देवाला प्रार्थना करून पाढ्याला सुरुवात करायचो. म्हणता-म्हणता पाढ्याची गाडी थांबली की, खाकी पँटीच्या खालचा कोपरा डाव्या आणि उजव्या हाताने पिरगळा मारायचो आणि साते-आठे, साते-आठे म्हणून थांबून जायचो.खाली बसलेल्या जिवलगाला उडलेली तारांबळ बघवत नव्हती. तो हळूच बारीक आवाजात म्हणायचा,छपन्नमग काय जणू पाढा पाठच आहे, तेव्हाचं मेणघुन्ह्यावाणी बंद पडलेलं तोंड एकदम उघडायचो. मोठ्यानं सात ते आठे छपन्न म्हणून,पाड्याची थांबलेली गाडी पुढे धकायची जीवात-जीव यायचा.अन हिमतीन सात नवे त्रेसष्ठ आणि सात दाहे सत्तर म्हटलं की, गपकन खाली बसायचो. मोकळा श्वास सोडायचो.खरंच! काही जिवलग मित्रांना अशी बिकट अवस्था बघवत नसायची म्हणून ते निभवून घ्यायचे. मात्र,काही याला गुरुजींचा हातचा मार बसला पाहिजे म्हणून सांगतही नव्हते.त्यातील काहीच बोटावर मोजणे इतकेच होते कारण ते हुशार,शिस्तप्रिय अन अभ्यासू विद्यार्थी...!



**- विनोद जाधव**
**मासरूळ जि.बुलडाणा**
**मो.९७६३२८२०७७**

दहा पर्यंत पाढे तोंडपाठ झाल्यानंतर, अकरा ते वीस पर्यंत पाढे तोंडपाठ करण्यासाठी ही कसरत करावीच लागली.अकरा आणि विसच्या तर लवकर पाठ झाला मात्र बारा ते एकोणवीसचं मात्र कठीणच काम होतं. अकरा व विसचा पाढा तर अगदी सोपे होता अकरा एके अकरा दुणे बावीस अर्थात,एकावर एक अकरा दोनावर दोन बावीस तीनावर तीन ते तेहतीस अशा पद्धतीने अकरा दाहो ऐकशे दहा अन वीसचा पाढाही अगदी तसाच वीस च्या पटीत म्हणजेच वीस एके वीस,वीस दुणे चाळीस,साठ, अश्या पद्धतीने वीस दाहो दोनशे म्हटलं कि पाढा झाला. मात्र बारा ते एकोणवीसपर्यंतचे पाढे पाठ करायला बरीच कसरत करावी लागली. चौथी सरली. पण पाढे मात्र पाठ झालेच नाही. अद्यापपर्यंत पंधरा-सोळा च्या पुढील पाढे पूर्ण पाठ नाहीच. तेव्हा गुरुजी पाठ करवून घ्यायचे. तेव्हा गुरुजींचा धाक होता आता जीवनातल्या हिशोबांच्या आयुष्याचे वेगळेच पाढे चालू आहेत. जीवनातील आकडेमोडींची संख्या वाढली परंतु ज्या धाकांनी गुरुजींनी पाढे पाठ करून घेतले तो,आनंदच वेगळा होता. तेव्हा आकड्यांचा व्यवहार फारसा नव्हता परंतु पाढे करून घेणारे गुरुजी सोबतीला होते. आता या आकड्यांच्या आणि हिशोबांच्या गर्दीत स्वतः स्वतःलाच शिकवावे लागत आहे आणि आयुष्यातील पाढे वाचावे लागत आहे.

उच्च-प्राथमिक वर्गात तर आकड्यांचा हिशोब वाढत गेला. गणिताचे स्वरूप व्यापक होत गेले. तेव्हा एकवीसचे पाढे पाठ्यपुस्तकात होते. पण खरं सांगू, नंतरचे पाढे आयुष्यात माझ्याकडून कधीच पाठ झाले नाही. जेमतेम वीस पर्यंत होते. त्यातही बऱ्याच वेळेस अडखळत होतो आणि आताही पाठपुरेशे नाहीच.एकवीसच्या पुढील पाढे कदाचित आमच्या पिढीतील मुलांचे पाठ असतील की नाही माहित नाही. माझ्या मते कदाचित नसेलच..! कारण आयुष्याला पुरेल एवढं गणित सातवी-आठवीपर्यंत शिकलो. त्यापुढील गणित आयुष्यात फारसे उपयोगी पडले नाही. अभ्यासक्रमातील व पाठ्यपुस्तकातील गणित,बीजगणित उपयोगाचे नव्हते असे मी म्हणत नाही.त्याचा उपयोग वेगवेगळ्या क्षेत्रात झालाच.भूमी- अभिलेख मध्ये भूमितीचा उपयोग जागा, जमीन,घर प्लॉट मोजणीसाठी उपयोगात येतोच. त्यात शंका नाही.आणि बीजगणितातील एक्स, वाय,झेड ची गणितं ही कुशाग्र अभियंते, कॉन्ट्रॅक्टर यांना उपयोगाचे ठरले व ठरत आहे.गणित व भूमिती या सर्व निर्जीव आणि भौतिक गोष्टी मोजण्यासाठी उपयोगाचे आहेच.मात्र मानवी जीवनातील दैनंदिन व्यवहार हा मात्र माझ्या पहिली ते सातवीपर्यंतच्या गणितातील आणि गणिताच्या पाढ्यांमध्ये दडलेला आहे.

मित्रांनो! ही गणितातील हे पाढे जरी आकडेमोडीमुळे आपणास कंटाळवाणे वाटत असले तरी,आपल्या गुरुजींची आपल्याविषयी तळमळ होती. माझा विध्यार्थी जीवनातील आर्थिक व्यवहारात मागे राहता कामा नये.त्यांनी जीवनातील दैनंदिन व्यवहारातील पावलोपावली पडणाऱ्या हिशोबसाठी गणित व गणितातील पाढे किती महत्त्वाचे आहे याचीजाणीव करून दिली. कारण ही दुनिया फसवी आहे.खोटारडी आहे. मानवांच्या फसव्या स्वभावाच्या व वाईट वृत्तींच्या लोकांसमवेत माझा विद्यार्थी फसला जाऊ नये.असा त्यांचा मुख्य उद्देश होता. म्हणून गणित शिकवणारे गुरुजी कायम स्मरणात आहे व कायम स्मरणात राहतील कारण,पावलोपावली जीवनात गणित आणि गणितातील पाढ्यांचा संबंध येतो.तेच गणित व पाढे जीवनातील दैनिक व्यवहार सुखकर करण्यास मदत करत आहे.

**समस्त गुरुजनांना समर्पित..!**

# मराठवाडा मुक्ती संग्राम दिन



**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**मो.९९२२५४६२९५**

आज १७ सप्टेंबर, आजचा दिवस मराठवाडा मुक्ती संग्राम दिन म्हणून साजरा केला जातो. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले मात्र मराठवाडा प्रांत हा पारतंत्र्यातच होता. पूर्वी मराठवाडा हैदराबाद संस्थांनात विलीन होता. हैदराबाद संस्थानावर निजाम उर उस्मान अली खान निजाम उल मुल्क आसफजाह याचे राज्य होते. निजामाने हैदराबाद संस्थान भारतात विलीन करण्यास स्पष्ट नकार दिला होता.

मात्र हैदराबाद संस्थानातील जनता भारतात सामील होण्याच्या बाजूने होते. निजामाच्या संस्थानातून मुक्त होऊन भारतीय संघ राज्यात सामील होण्यासाठी स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण हैदराबाद संस्थानात मुक्ती संग्राम आंदोलन सुरू झाले. हैदराबाद संस्थानाची लोकसंख्या त्यावेळी दीड कोटीच्या वर होती. या संस्थांनात तेलंगणा, मराठवाडा आणि कर्नाटकचा काही भाग होता. मुक्ती संग्राम सुरू झाल्यावर निजामाचा सेनापती कासीम रिझवी याने जनतेवर खूप अत्याचार केले. दुसऱ्या बाजूला स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉफ, रविनारायण रेड्डी, बाबासाहेब परांजपे यांच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्य संग्राम वेगात सुरू होता. मराठवाडा मुक्ती संग्राम मराठवाड्यातील गावागावात लढला जात होता. यात हजारो स्वातंत्र्य सैनिक पुढे आले.

स्वातंत्र्य सैनिकांच्या प्रदीर्घ लढ्यानंतरही निजाम शरण येत नाही उलट जनतेवरील अन्याय अत्याचार वाढतच आहे हे पाहून १३ सप्टेंबर १९४८ रोजी भारत सरकारने हैदराबाद संस्थानात पोलीस कारवाई सुरू केली. सरदार वल्लभभाई पटेल हे त्यावेळी भारताचे गृहमंत्री होते. ते खूप धाडसी होते त्यांच्या धाडसी आणि अचूक निर्णयाने जनतेस न्याय मिळाला. मुख्य फौजा सोलापूरकडून घुसल्या. पहाटे चार वाजता कारवाई सुरू झाल्यावर २ तासात नळदुर्ग व सांयकाळ पर्यंत तुळजापूर, परभणी ते मणीगड, कनेरगाव भारतीय फौजांनी सर केले. चाळीसगावहुन निघालेल्या फौजेने कन्नड,दौलताबाद काबीज केले. १५ सप्टेंबर रोजी औरंगाबाद सर करून भारतीय फौजा पुढे निघाल्या. भारतीय फौजांपुढे निजामाच्या फौजेचे काही चालले नाही. अखेर १७ सप्टेंबर १९४८ रोजी निजामाचा सेनाप्रमुख जनरल अल इद्रीस याने शरणागती पत्करली. सेनाप्रमुखच शरण गेल्याने निजामही शरण आला. १७ सप्टेंबर १९४८ रोजी हैदराबाद संस्थान निजामाच्या गुलामीतून मुक्त झाले. हैदराबाद मुक्ती संग्राम यशस्वी झाला.

हैदराबाद संस्थानावर तिरंगा फडकला. हैदराबाद संस्थानातील निजामाच्या अन्यायी राजवटी विरुद्धचा लढा मराठवाड्यातील जनतेने यशस्वी केला . तेंव्हापासून आजचा दिवस म्हणजे १७ सप्टेंबर हा दिवस मराठवाडा मुक्ती संग्राम म्हणून साजरा केला जातो. मराठवाडा मुक्ती संग्रामात ज्या ज्ञात अज्ञात स्वातंत्र्य सैनिकांनी आपल्या प्राणाची आहुती दिली त्या स्वातंत्र्य सैनिकांना मानाचा मुजरा. सर्व मराठवाडा वासीयांना मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

# भारतीय अभिनेत्रीला ऑस्ट्रेलियात जाई जुईंचा गजरा पडला महागात...

## वाचक पत्र

सेलिब्रिटी आणि विमानतळ या दोन गोष्टींचे अतूट नाते आहे.अनेक किस्से विमानतळावर घडत असतात. मिडिया आणि सेलिब्रिटींच्या गप्पा असतील किंवा विमानतळावर होणारी भांडणं काही तरी चालू असतंच.असाच एक किस्सा सोशल मिडियावर व्हायरल झाला असून प्रदेशात कायदे किती कडक आहेत याची प्रचिती नुकतीच आली आहे मल्याळम अभिनेत्री नव्या नायरला ऑस्ट्रेलिया एअरपोर्टवर १ लाख १४ हजारांचा दंड आकारल्याचे समोर आले आहे बायो-सिक्युरिटी नियमानुसार ऑस्ट्रेलिया या देशात जाताना प्रवासी जैविक काहीही घेऊन जाऊ शकत नाही. फळे, फुले, मसाले ज्यात कीड असू शकते असे काहीही इतर कोणत्याही देशातून ऑस्ट्रेलियाला नेणे कायद्याने अपराध आहे. कारण अशा वस्तू पर्यावरणीय धोका निर्माण करु शकतात. नव्याने माळलेला गरजाही त्या चौकटीत बसतो आणि त्यामुळे तिला दंड आकारला गेला. २००० ऑस्ट्रेलियन डॉलर्स म्हणजेच सुमारे १ लाख १४ हजार इतक्या रकमेचा दंड तिला भरावा लागला. ओणम साजरा करण्यासाठी माळलेला गजरा एवढा माहागात पडेल असा नव्याने विचारही केला नव्हता. ऑस्ट्रेलियात अज्ञानी व्यक्तिलाही माफ केले जात नाही त्यामूळे नव्याला जागेवरच दंड आकारण्यात आला तिच्याकडे जाई - जुईंच्या फुलांचा गजरा आढळला ऑस्ट्रेलिया कडक जैवसुरक्षा असलेल्या देशापैकी एक आहे परदेशातून फुले, फळे, अन्नपदार्थ बिया या गोष्टींवर सक्तीने बंदी आहे अशा वस्तूंमुळे स्थानिक शेती , पर्यावरण आणि जैवविविधतेला धोका निर्माण होतो अशी त्यांची धारणा असल्यामुळें कडल कायदे असून त्यांची अमंलबजावणी चोख आहे कधीकधी लहान चूक मोठा दंड भरायला लावू शकते. त्यामूळे विदेशी प्रवास करताना ज्या ठिकाणी जाता तेथील नियम, कायदे यासंबंधी माहिती असणे फार गरजेचे बनले आहे !

**- राजू जाधव, मांगूर जि. बेळगांव**

## धुमाकूळ..



कायझाले पावसाले
यंदा घाले धुमाकूळ
अस्ताव्यस्त बरसतो
बागडेसर्वत्र खङ्गूळ

जरासे रोपटे बहरता
उखडून टाकतो मूळ
नतद्रष्ट लावतोय दृष्ट
कष्ट उधळतो समूळ

दुबार तिबार पेरण्या
विचित्र जोपासे खूळ
शिस्त त्याले का नसे
गाडी धावे सोडू रूळ

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

अवर्षण ग्रस्त भागात
पडलाआधी मुळमुळ
आताबरसतोधडाडून
समस्त झाले व्याकुळ

नुकते बांधले रस्ते ही
करूनटाकतो ठिसूळ
उधळतोस सभा मोर्चे
उडाण टप्पू उपट सूळ

कधी बने विरोधी पक्ष
उठतो तुझा पोट शूळ
सत्ताधिशासम वागतो
स्वतासवाटे पॉवरफूल

**- हेमंत मुसरीक, पुणे**
**मो.९७३०३०६९९६**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## भोसले (डी.एड.) अध्यापक विद्यालयात हिंदी दिन साजरा



**अक्षराज : अशोक लोणीकर**

**दि.१५, मुखेड (नांदेड) :** मुखेड तालुक्यातील मुक्रमाबाद येथील भोसले अध्यापक विद्यालयात हिंदी दिन साजरा करण्यात आला. अध्यापक महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थ्यांनी हिंदी दिनाचे औचित्य साधून कार्यक्रम यशस्वी केला.कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. भाऊसाहेब देशमुख विद्यालयाचे सन्माननीय मुख्याध्यापक. मोरे. बी. एस. होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. घोनशिकर ए.आर. होते.

भाऊसाहेब क. महाविद्यालयाचे प्राचार्य. चन्नावार संजय.प्रा. खंदाडे विजय. तसेच संस्थेचे सचिव. दलितमित्र. भोसले रामराव. तसेच प्रा. नेलवाडे. एस. एस. प्रा. पाटील आशुतोष, प्रा. ॲड. गायकवाड पी. एम, प्रा. भोसले डी. एन, प्रा. पांचाळ अनुसया. प्रा. गायकवाड मयूरी, डी. एड. महाविद्यालयाची छात्राध्यापक कोटग्याळे सादिया यांनी सुत्रसंचलन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी लोगणे प्रदीप. मारंपल्ले, प्रियांका बिरादार, नालंदा कांबळे, विवेक कांबळे, गायकवाड, अप्पाने, कोटले,ज्योती सुरनर, स्नेहा, बावगे नंदिनी, पाटील सारिका, कोमल, अंबिका जाधव, डोरनाळे, शेख फातेमा यांनी मेहनत घेतले.

## मुखेड येथे आशा गटप्रवक्ता फेडरेशनचे अधिवेशन संपन्न




**अक्षराज : अशोक लोणीकर**

**दि.१५ मुखेड (नांदेड) :** मुखेड येथील जि.प.हा.मुलींची या ठीकाणी आशा गटप्रवर्तक फेडरेशनचे अधिवेशन संपन्न झाले. आशा व गटप्रवर्तक किमान वेतन शासनाने द्यावे असे प्रतिपादन सीटू फेडरेशनच्या अध्यक्षा कॉ. उज्वला पडलवार यांनी केले. मुखेड जिल्हा परिषद मुलींच्या शाळेमध्ये आशा व गटप्रवक्ता फेडरेशनचे पाचवे तालुका अधिवेशन मोठ्या उत्साहात संपन्न झाले.

यावेळी शिक्षणाच्या जननी माता सावित्रीबाई फुले, माता जिजाई यांच्या प्रतिमेचे पुष्प वाहून अधिवेशनाची सुरुवात करण्यात आली. अध्यक्षस्थानी फेडरेशनच्या अध्यक्ष तथा सीटू राज्य सचिव उज्वला पडलवार तर प्रमुख पाहुणे म्हणून सीटू चे जनरल सेक्रेटरी कॉ. गंगाधर गायकवाड प्रमुख उपस्थित होती. उज्वला पडलवार यांनी जन सुरक्षा कायद्याच्या विरोधात एकीच्या बळावर लढाई तीव्र करून आपले अधिकार टिकून ठेवावे लागतील असे सांगितले. आशा व गटप्रवक्ते अत्यंत तुटपुंज्या मानधनावर काम करतात त्यांना किमान वेतन देऊन कर्मचाऱ्यांचा दर्जा देण्यात यावा आपल्या नोकऱ्या टिकवून ठेवण्यासाठी आणखी तीव्र संघर्ष करावे लागेल असे गायकवाड हे म्हणाले. प्रस्ताविक अंकुश माचेलवार तर सूत्रसंचालन रेणुका देवकते यांनी केला. अधिवेशन यशस्वीरीत्या व आभार,आशा व गटप्रवर्तक ताईने आभार मानले आहे.

## हिंदी दिवसानिमित्त सरदार पटेल महाविद्यालयात निबंध स्पर्धा संपन्न



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१५, चंद्रपूर :** सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर येथे १४ सप्टेंबर २०२५ रोजी 'हिंदी दिवस' निमित्त मेरा युवा भारत, व राष्ट्रीय सेवा योजना चंद्रपूर यांच्या संयुक्त विद्यमाने वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. एम. काटकर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आले. या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. शरयू पोटनुरवार, प्रमुख अतिथी ॲड. देवा पाचभाई, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी, डॉ. कुलदीप आर. गोंड, डॉ. पुरुषोत्तम माहोरे, डॉ. निखिल देशमुख, शारीरिक शिक्षण व क्रीडा विभागाच्या संचालिका डॉ. पुष्पांजली कांबळे, महाविद्यालयाचे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या स्पर्धेत अनेक स्पर्धकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. स्पर्धेत प्रबुद्ध गेडाम यांनी प्रथम क्रमांक, वृषाली गेडाम यांनी द्वितीय क्रमांक, तर गौरव झाडे यांनी तृतीय क्रमांक पटकावला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. एम. काटकर यांच्या हस्ते सर्व विजेत्यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. दरम्यान सर्वोदय शिक्षण मंडळाचे अध्यक्ष अरविंद पोरेड्डीवार, कार्याध्यक्ष आ. किशोर जोरगेवार, उपाध्यक्ष सुदर्शन निमकर, सगुणाताई तलांडी, सचिव प्रशांत पोटदुखे, सहसचिव डॉ. किर्तीवर्धन दीक्षित, कोषाध्यक्ष संदीप गड्डमवार, सर्वोदय शिक्षण मंडळाचे कार्यकारी सदस्य, राकेश पटेल, सुरेश पोटदुखे, चंद्रशेखर वाडेगावकर, जिनेश पटेल यांनी उपरोक्त उपक्रमाबद्दल शुभेच्छा दिल्या.

## घाटकुळ येथे शेतकरी जनसुविधा शिबीर संपन्न



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१६, पोंभुर्णा (चंद्रपूर) :** विनोद देशमुख, माजी उपसभापती पंचायत समिती पोंभुर्णा यांच्या सहकार्याने दिनांक १४ सप्टेंबर २०२५ रोजी मौजा घाटकुळ येथे शेतकरी जनसुविधा कॅम्पचे आयोजन करण्यात आले. या शिबिराद्वारे कृषी विभागाच्या महाडीबीटी पोर्टलवरील विविध योजनांसाठी ऑनलाईन अर्ज भरले गेले. यात ट्रॅक्टर, रोटावेटर, पॉवर टिलर, फवारणी पंप, ठिबक व तुषार संच, मिरची पिकासाठी अनुदान अशा अनेक योजनांचा लाभ घेण्यासाठी ऑनलाईन अर्ज भरण्यात आले. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेत अडचणीत असलेली खाती पुन्हा सुरु करण्याचे काम करण्यात आले. तसेच वन्यप्राण्यांमुळे शेतीचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांसाठी वनविभागाकडे भरपाईसाठी ऑनलाइन अर्जही करण्यात आले.

या उपक्रमात ग्रामपंचायत संगणक ऑपरेटर आकाश देठे, दुशांत शिंदे, शैलेश शिंदे, तसेच पीएम किसान योजनेचे संगणक चालक शैलेश पोलेलवार व टाटा ट्रस्ट चे प्रभाग समन्वयक निवास राठोड यांचे मोलाचे योगदान लाभले. गावकऱ्यांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

## श्रमजीवी संघटनेचा एकाच वेळी शहापूर मधील ४ शासकीय कार्यालयांवर मोर्चा





**अक्षराज : रविंद्र खाडे**

**दि.१५, शहापूर (ठाणे) :** श्रमजीवी संघटनेच्या वतीने आज दिनांक १५/०९/२०२५ रोजी शहापूर मध्ये एकाच वेळी चार शासकीय कार्यालयांवर खालील कार्यकर्त्यांच्या नेतृत्वात मोर्चा काढून निवेदन दिले. १) आदिवासी विकास प्रकल्प शहापूर येथे कमलाकर शिंदे व रुपेश आहिरे यांच्या नेतृत्वात २) पंचायत समिती शहापूर येथे लक्ष्मण चौधरी व कैलास मुकणे यांच्या नेतृत्वात ३) तहसिल कार्यालयात शहापूर येथे मालू हुमणे, ईश्वर बनसोडे व विशाल मुकणे. यांच्या नेतृत्वात ४) वनविभाग शहापूर येथे प्रकाश खोडका, राजेंद्र म्हसकर व पप्पू वाघ यांच्या नेतृत्वात मोर्चा काढून निवेदन देण्यात आले.

या अगोदर जेव्हा शासकीय अधिकारी यांनी दिलेली आश्वासन न पाळल्यामुळे त्यांनी जाब विचारण्यात आला.

दि.११ मार्च २०२५ रोजी श्रमजीवी संघटनेच्या नेतृत्वाखाली आपल्या कार्यालयावर मोर्चा आयोजित करण्यात आला होता त्या अनुषंगाने आपण त्याआधीच दि. १० मार्च २०२५ रोजी श्रमजीवी संघटनेच्या शिष्टमंडळा सोबत आपण चर्चा केली होती. त्या चर्चेत आपण प्रथम सहा प्रस्ताव डी.एल.सी कडे पाठवून मंजूर करून देण्याचे व त्यानंतर उर्वरित सर्व प्रस्ताव मंजूर करण्याचे आश्वासन दिले होते.

पण आजपर्यंत त्या आश्वासनाला कोणतेही मूर्त रूप दिलेले नाही. सहा प्रस्ताव डी एल सी कडे पाठवण्याची व उर्वरित प्रस्ताव मंजूर करण्याची प्रक्रिया आजही प्रलंबित आहे. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. आश्वासन देऊन त्याची पूर्तता न करणे हा थेट आदिवासी समाजाशी केलेला विश्वासघात आहे.

तसेच, गावठाण विस्तार व सुख सुविधांसाठी ७५ पेक्षा जास्त दावे दाखल आहेत, तसेच रस्त्यांसाठी स्वतंत्र दावे दाखल आहेत, तरी सुद्धा त्यावर कोणताही निर्णय घेतलेला नाही.

कायद्यानुसार प्रत्येक पाड्याला किमान १०० गुंठे गावठाण मिळायला हवे, पण आपल्या विभागातील अधिकारी जाणीवपूर्वक कमी क्षेत्र दाखवतात. याहूनही गंभीर बाब म्हणजे शासनाकडून घरकुल मंजूर झाले परतू तरी जागा न दिल्यामुळे आदिवासींना घर वनक्षेत्रात उभारावी लागली. त्याच घरावर वनविभाग गुन्हे दाखल केले. हा प्रकार केवळ अन्यायकारक नाही तर अमानुष आहे.

शहापूर तालुका डोंगराळ व जंगली असून येथे कातकरी व आदिवासी समाज पिढ्यान्‌ पिढ्या येथे राहतो. त्यांची उपजीविका केवळ वन पलाठावर अवलंबून आहे. कायदा होऊन वीस वर्षे पूर्ण होत असतानाही ग्रामसभेचा ठराव, वनहक्क समितीची शिफारस, गावातील ज्येष्ठ व्यक्तींच्या जबाबांसह आमच्याकडे अतिक्रमणाची ठोस पुरावे असतानाही आजतागायत वनविभागाने नमुना व स्थळ पाहणी वेळेवर केलेली नाही. त्यामुळे हजारो आदिवासी बांधव अजूनही त्यांच्या हक्काच्या जमिनीपासून वंचित आहेत. हा प्रकार केवळ दिरंगाई नाही, तर आमच्या जगण्याशी केलेला थेट अन्याय आहे. मागील वर्षी १७ डिसेंबर २०२४ रोजी तहसील कार्यालय शहापूर येथे काढण्यात आलेल्या मोर्चात ह्याच मागण्या मांडण्यात आल्या होत्या. परंतु आजतागायत त्या पूर्ण झालेल्या नाहीत. यांचा आम्ही निषेध करतो या बाबतीत जर आपल्या स्तरावरुन पुर्तात झाली नाही तर यापुढे आपल्या कार्यालया समोर संघटने मार्फत तिव्र आंदोलन करण्यात येईल यांची अस निवेदनात म्हटले असून खालील प्रमाणे निवेदनाद्वारे मागण्या केलेल्या आहेत..

१. आपण दिलेल्या आश्वासनानुसार सर्व गावठाण जागेच्या सुविधांचे प्रस्ताव तात्काळ मंजूर करून द्यावेत.

२. प्रत्येक पाड्याला किमान १०० गुंठे गावठाण जागा मंजूर करावी

३. शहापूर तालुक्यातील रस्त्यांकरिता दाखल केलेले सुखसुविधा दावे तात्काळ मंजूर करण्यात यावेत..

४. शासनाने नव्याने मंजूर केलेली घरकुले कायदेशीर गावठाणात उभारण्यासाठी जागा उपलब्ध करून द्यावी, वन विभागाने कोणताही अडथळा निर्माण करू नये व संबंधित गुन्हे मागे घ्यावेत.

५. वैयक्तिक वनहक्क दाव्यांची स्थळ पाहणी करून शासनाकडे प्रस्ताव पाठवावेत.

६. वरील विषयांच्या पाठपुराव्यासाठी दर महिन्याच्या चौथ्या सोमवारी नियमित बैठक आयोजित करण्यात यावी. अशा विविध मागण्या निवेदना द्वारे करण्यात आल्या.

## दुबार नावांवर शिवसेना (उबाठा) पक्षाचा आवाज : निवडणूक अधिकाऱ्यांना निवेदन सादर

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.१६, कल्याण (ठाणे) :** कल्याण ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील मतदार याद्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर दुबार नावे आढळून येत असल्याच्या तक्रारी आज शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने निवडणूक अधिकाऱ्यांकडे नोंदवल्या.

या संदर्भात जिल्हा संघटक तात्या माने यांच्या नेतृत्वाखाली, कल्याण ग्रामीण विधानसभा प्रमुख ॲड. रोहिदास मुंडे, दिवा शहर प्रमुख सचिन पाटील व उपशहर प्रमुख मारुती पडलकर यांनी




निवडणूक अधिकाऱ्यांना निवेदन दिले.

निवेदनात नमूद करण्यात आले की, दिवा शहरासह संपूर्ण कल्याण ग्रामीण विधानसभा क्षेत्रात मतदार याद्यांमध्ये असंख्य मतदारांची नावे दोनवेळा किंवा त्याहून अधिक वेळा समाविष्ट झाली आहेत. यामुळे मतदारांमध्ये गोंधळ निर्माण होतो असून, निवडणुकीची पारदर्शकता धोक्यात येत आहे.

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने स्पष्ट मागणी केली की, सर्व दुबार नावे तात्काळ वगळून मतदार यादी शुद्ध करण्यात यावी, जेणेकरून लोकशाही प्रक्रियेत जनतेचा विश्वास कायम राहील. पक्षाने निवडणूक अधिकाऱ्यांचे लक्ष वेधले की, या प्रकरणी तातडीने कार्यवाही झाली नाही तर मतदारांचा विश्वास कमी होईल आणि लोकशाही धोक्यात येईल.

## खा.प्रतिभा धानोरकर यांच्या मध्यस्थीने महाकाली मंदिर परिसरातील व्यापाऱ्यांच्या समस्या मार्गी

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१६, चंद्रपूर :** महाकाली मंदिर परिसरातील व्यापाऱ्यांच्या अनेक वर्षापासूनच्या समस्यांवर तोडगा काढण्यासाठी दि. १५ सप्टेबर रोजी चंद्रपूर महानगरपालिकेच्या सभागृहात खा. प्रतिभा धानोरकर यांच्या अध्यक्षतेखाली एक महत्वाची बैठक घेण्यात आली. या बैठकीत शहरातील व्यापारी प्रतिनिधींनी त्यांच्या अडचणी आणि समस्या मांडल्या. विशेषत: महिला व्यापाऱ्यांनी त्यांना भेडसावणाऱ्या विविध आव्हानांविषयी सविस्तर चर्चा केली. या बैठकीत अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला एक महत्वाचा प्रश्न मार्गी लागला. महाकाली मंदिराच्या परिसरातील किरकोळ विक्रेत्यांना नवरात्रोत्सवादरम्यान त्यांच्या मूळ जागेवरुन हटवून दुसरीकडे जागा दिली जात असे. ज्यामुळे त्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत होते. यावर तोडगा म्हणून, आता या विक्रेत्यांना त्यांच्या मंदिर परिसरात दुकानाकरीता जागा उपलब्ध करुन देण्याबरोबरच त्यांना नोंदणीकृत प्रमाणपत्र देऊन अधिकृत फेरीवाल्यांचा दर्जा देण्यात येणार आहे. त्यामुळे या व्यापाऱ्यांचा व्यवसाय सुरक्षित होऊन त्यांचे आर्थिक नुकसान टळणार आहे. त्यासोबत नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमिवर, खा. प्रतिभा धानोरकर यांनी भाविक आणि व्यापाऱ्यांच्या सोयीसाठी महानगरपालिका प्रशासनाने योग्य




उपाययोजना कराव्यात, अशा सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

या बैठकीत महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त चंदन पाटील, उपायुक्त मंगेश खवले, शहर अभियंता रविंद्र हजारे, चंद्रपूर जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे शहराध्यक्ष रामु (रितेश) तिवारी, महिला कॉंग्रेस शहर अध्यक्ष चंदा वैरागडे, अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष सोहेल राजा, कॉंग्रेस नेते संतोष लहामगे, इंटक नेते प्रशांत भारती, आणि अनेक व्यापारी बंधू- भगिनी उपस्थित होते.

## सरपंचावर सहकुटुंब रोजगार हमीच्या कामावर जाण्याची वेळ

**अक्षराज : विजय मांडे**

**दि.१६, श्रीगोंदा :** श्रीगोंदा तालुक्यातील चिखली गावचे विद्यमान सरपंच व नामांकित ठेकेदार कुलदीप पांडुरंग कदम यांनी कुटुंबातीलच अनेक जण निमशासकीय व खासगी नोकरीस आहेत.तरी पण आई,वडील,पत्नी, भाऊ व भावकीतील काही जणांचे यांच्या नावावर महाराष्ट्र शासन रोजगार हमी योजनेचे मजुरासाठी असणारे अत्यावश्यक जॉब कार्ड बनवून विहीर, शेततळे, गोठा कॉंक्रीटीकरण व फळबाग संत्री, सिताफळ या फळबागासह आपल्या पदाचा गैरफायदा घेऊन ग्रामविकास अधिकारी, कृषी अधिकारी, रोजगार हमीच्या अधिकाऱ्यावर दबाव टाकून कागदोपत्री कामे दाखवून



लाखो रुपयांचे बिले अदा केली आहेत. या प्रकरणाची सखोल चौकशी करून योग्य ती कारवाई करावी अशी मागणी ग्रामस्थांमधून होत आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, चिखली गावचे सरपंच कुलदीप पांडुरंग कदम हे असून, त्यांचे वडील जिल्ह्यातील एका नामांकित संस्थेत सध्या कार्यरत आहेत तर आई या सध्या गावातील अंगणवाडी सेविका कार्यरत आहेत तर त्यांच्या पत्नी या चार्टर्ड अकाऊंटट आहेत. तसेच भाऊ व भावकीतील काही जणांचे सरपंच यांनी या सर्वांचे महाराष्ट्र शासन रोजगार हमी योजनेचे जॉब कार्ड बनवून शासनाची पंचायत समिती मधून विहीर, गोठा कॉंक्रीटीकरण, कृषी विभागाकडून शेततळे, संत्रा, सिताफळ हे प्रकरणे स्वतःच्या पदाचा गैरवापर करुन मंजूर करून घेतले व कागदोपत्री कामे दाखवून सहकुटुंब रोजगार हमीच्या कामावर जात असल्याचे दाखवून लाखो रुपये शासनाचे लाटले आहेत. सरपंचाला सहकुटुंब रोजगार हमीच्या कामावर जावे लागल्याने व शासनाचे लाखो रुपये लाटल्याने व यामध्ये सामील असलेल्या पंचायत समिती व कृषी विभागातील अधिकाऱ्यांची व सरपंच यांची चौकशी होऊन योग्य ती कारवाई करावी अशी सजग नागरिकांतून मागणी होत आहे.

गावचे सरपंच कुलदीप पांडुरंग कदम हे नामांकित ठेकेदार असून त्यांचे कोट्यवधी रुपयांची जिल्ह्यासह तालुक्यात कामे सुरू आहेत. ते नामांकित कंपनीच्या आलिशान गाडीत फिरत असतात. मग हे सर्व शासनाच्या रोजगार हमी योजनेचे जॉब कार्ड दिले कसे व हे कामावर गेले कसे व यांच्या बँक खात्यावर रोजगार हमीचे पैसे जमा झाले कसे तरी ते सरकारचा आयकर भरत असताना सुद्धा व घरातील सर्वच सुशिक्षित कुटुंब असताना मजुर दाखवून शासनाचे लाखो रुपये लाटले कसे यासाठी कोणत्या कोणत्या अधिकारी यांनी मदत केली त्यांची चौकशी होणे गरजेचे आहे.

# मुदखेड येथे ओबीसी संघटनेची बैठक संपन्न

## या बैठकीत तहसील कार्यालयांवर मोर्चाचा निर्धार



**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.१६, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड तालुक्यांत ओबीसी समाजाची एक महत्त्वपूर्ण बैठक सुभाष गंज मोंढा येथे माजी नगरसेवक गोविंद गोपनपल्ले यांच्या निवासस्थानी पार पडली.

या बैठकीत मराठा समाजाला ओबीसीम धुन आरक्षण देण्याच्या सरकारच्या निर्णयावर चर्चा झाली या बैठकीत मराठा आरक्षणाला विरोध दर्शवत ओबीसी समाजाने आंदोलनाची पुढील दिशा ठरवली मराठा समाजाला ओबीसी मध्ये समाविष्ट करण्याच्या निर्णयामुळे ओबीसी समाजाच्या आरक्षणावर अन्याय होत असल्याचा आरोप या बैठकीत करण्यात आला.

मुदखेड तहसील कार्यालयावर मोर्चा काढण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला असून, आगामी काळात हे आंदोलन अधिक तीव्र करण्याचा निर्धार या बैठकीत घेण्यात आला. या बैठकीला तालुक्यातील ओबीसी आरक्षणात दुसऱ्यांना वाट नको हा प्रमुख मुद्दा हाती घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने जो जी आर काढला तो रद्द केल्याशिवाय गप्प बसणार नाही व तसेच सरकार मधील सर्व मंत्र्यांना घेराव घालून जॉब विचारणार असल्याचे ओबीसी समाजाचे नेते अविनाश भोसीकर यांनी सांगितले. जिल्ह्यांतील सर्व तालुक्यांतील मोर्चा झाल्यानंतर ओबीसी नेते मंत्री छगन भुजबळ यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालयावर ५ लाख ओबीसी समाजाचा म ोर्चा काढला जाणार असं ही अँड अविनाश भोसीकर यांनी सांगितले. ओबीसी समाज आता एकजुट होत असुन येणाऱ्या जिल्हा परिषद पंचायत समिती नगरपालिका निवडणुकीत प्रस्थापितांना मोठा धक्का बसणार असल्याची चर्चा या बैठकीत ऐकावयास मिळाली. जिल्हा ओबीसी संघर्ष समितीचे ॲड.अविनाश भोसीकर, महेंद्र दमगुडे, गोडसे बारडकर, कैलास गोडसे, गोविंद गोपनपल्ले, उमाकांत घोंगडे, रामसिंग चव्हाण, सुरेश शेटे, प्रकाश बल्फेवाड, पंकज पचलिंग, गोविंद बने, प्रभाकर चंद्रे, कानोबा बिस्मिल्ले, योगेश खांडरे, कालिदास जंगीलवाड, गोविंद गडमवार, विठ्ठल आचार्य, नजीर कुरेशी, सचिन चंद्रे, गजाननराव बोडके, मारोती कमजळे, हरी बैनवाड, माधव बोडके, गजानन कमळे गजानन संबोड, पत्रकार ईश्वर पिन्नलवार, रुखमाजी शिंदे, प्रकाश हामंद, संतोष सावंत, अब्दुल रजाक, हाफिज कुरेशी भिमराव महादवाड, श्रीहरी बैनवाड, गंगाधर कुंचटवार, संतोष गायकवाड, सचिन चंद्रे, राम हामंद, बाळू चंद्रे, प्रल्हाद कवडे, मानसिंग गिरी, योगेश खांडरे, दत्ता हामंद, मारोती हामंद, गजू बोडके, राजू बोडके, सुभाष हामंद, आनंदा गोरठेकर यांच्यासह डोणगाव, राजवाडी, मेंडका, पिंपळकौठा मगरे, बारड, हाजापूर, म ुगट, पिंपळकौठा चोर, गोपाळवाडी, चिकाळा तांडा, न्याहाळी, डोगरगाव यांच्यासह गावांतून ओबीसी समाज मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'बाळाचे पहिले सुवर्णमयी १००० दिवस' पुस्तिका बालसंगोपनासाठी महत्त्वपूर्ण - आयुक्त पगारे

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१६, नवी मुंबई :** शिशु व लहान बालकांचे, आहार पद्धती, पुरुष पालकांचा सहभाग वाढवणे, या विषयांवर आधारीत विविध उपक्रमांचे आयोजन राज्यातील अंगणवाडी केंद्रांमध्ये करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने या 'राष्ट्रीय पोषण माह' संदर्भात अधिक माहिती देण्याकरीता महिला व बालविकास विभाग, महाराष्ट्र राज्य, एकात्मिक बाल विकास सेवा योजना कार्यालयाच्या वतीने आयुक्त कैलास पगारे यांनी सविस्तर माहिती दिली. त्याचप्रमाणे 'बाळाचे पहिले सुवर्णमयी १००० दिवस' ही मार्गदर्शक पुस्तिका प्रकाशित करण्यात आली आहे. बालकांमधील कुपोषण प्रमाण कमी करण्याच्या दृष्टीने ही मार्गदर्शक पुस्तिका महत्त्वपूर्ण ठरणार आहे असेही त्यांनी सांगितले.

बाळाचे पहिले सुवर्णमयी १००० दिवस हे त्यांच्या आयुष्यातील अत्यंत महत्त्वाचे दिवस असतात. या काळात शारीरिक वाढ, मेंदूचा विकास, आहार, आरोग्य आणि शिकण्याच्या क्षमतांचा पाया रचला जातो. शारीरिक, बौद्धिक आणि भावनिक दृष्ट्या सक्षम मूल हे केवळ एका कुटुंबाची नव्हे तर संपूर्ण समाजाची आणि राष्ट्राची मोठी ताकत असते त्यामुळे या पहिल्या १००० दिवसांमध्ये योग्य काळजी घेणे, पोषण, आरोग्य व्यवस्थापन आणि योग्य मानसिक व भावनिक वातावरण देणे फार गरजेचे असते.

बालकाच्या वाढीच्या प्रत्येक टप्प्यावर पालकांनी कोणत्या गोष्टी लक्षात घ्याव्यात, कोणते गैरसमज टाळावेत आणि कोणत्या सवयी मुलांच्या भविष्यासाठी उपयुक्त ठरतील याचा सखोल उहापोह या पुस्तकात करण्यात आला आहे. या पुस्तकात बाळाच्या जन्मापासून ते त्याच्या पहिल्या दोन वर्षापर्यंतच्या सर्व महत्त्वाच्या टप्प्यांची माहिती दिली आहे गर्भधारणेपासून बाळाला जन्मापर्यंत मातेने घ्यावयाची आवश्यक काळजी, तपासण्या व लसीकरण तसेच जन्मानंतरचे एका तासाच्या आतील स्तनपान व पुढील लसीकरण शिशुच्या आरोग्याची निगा कशी राखावी, पहिले सहा महिने निव्वळ स्तनपान तसेच त्याच्या आहारात



कोणत्या गोष्टी असाव्यात, त्याच्या मेंदूच्या विकासासाठी कोणत्या क्रियाकल्पांची गरज आहे, हे वैज्ञानिक दृष्टिकोनातून आणि सहज सोप्या भाषेत या पुस्तकात समाविष्ट केले आहे. सरकार, आरोग्य संस्था, शिक्षक आणि पालक या सर्वांनी एकत्र येऊन या क्षेत्रात योगदान दिल्यास महाराष्ट्राची पुढची पिढी अधिक सक्षम व सुदृढ होण्यास मदत होईल. नागरिकांनी पुढाकार घेऊन या संदर्भात जनजागृती करावी असे आवाहन एकात्मिक बाल विकास सेवा योजना कार्यालय, महिला व बाल विकास विभाग आयुक्त, कैलास पगारे यांनी केले आहे.

# भिवंडी तालुकास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत ऑल सेंट्स हायस्कूलचा सर्वस्व दळवी अव्वल

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१६, भिवंडी (ठाणे) :** भिवंडी तालुकास्तरीय शासकीय शालेय बुद्धिबळ स्पर्धा पडघा येथील आर.के. पालवी विद्यालयात नुकत्याच उत्साहात पार पडल्या. १४, १७ व १९ वर्षांखालील वयोगटात १८० मुला-मुलींनी सहभाग नोंदवला. प्रत्येक वयोगटातील पहिल्या ५ खेळाडूंची निवड करण्यात आली. यशस्वी खेळाडूंना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

दिनांक २९ सप्टेंबर २०२५ रोजी पडघा स्थित आर.के. पालवी विद्यालयात होणाऱ्या जिल्हास्तरीय शालेय बुद्धिबळ स्पर्धेत हे निवड झालेले खेळाडू भिवंडी तालुक्याचे प्रतिनिधित्व करतील. स्पर्धेचे उद्घाटन आर.के.पालवी विद्यालयाचे प्राचार्य रवींद्र पालवे यांच्या हस्ते झाले.

याप्रसंगी राज्य क्रीडा मार्गदर्शक समीर सूर्यवंशी व भिवंडी तालुका क्रीडा केंद्र प्रमुख गुणवंत बेलखेडे हे उपस्थित होते. पंच म्हणून मयूर मोरे (अंबरनाथ) व राहुल टाक (बदलापूर) यांनी उत्तमरीत्या काम पाहिले.

**स्पर्धांचा निकाल पुढीलप्रमाणे :-**

**१४ वर्षाखालील मुले :-**

१) सर्वस्व स्वप्नील दळवी – ऑल सेंट्स हायस्कूल



२) हार्दिक माळी – होली मेरी कॉन्व्हेंट हायस्कूल
३) निरव चौघुले – होली मेरी कॉन्व्हेंट हायस्कूल
४) आरुष राणे – युरो स्कूल, अप्पर ठाणे
५) अंबाराम चौधरी – प्रेसिडेन्सी स्कूल

**१४ वर्षाखालील मुली :-**

१) इकरा फारुकी – होली मेरी कॉन्व्हेंट स्कूल
२) अद्विका एरंडे – ऑल सेंट्स हायस्कूल
३) स्वरा वटारी – होली मेरी कॉन्व्हेंट स्कूल
४) इशाना गुप्ता – ऑल सेंट्स हायस्कूल
५) आरवी मारु – होली मेरी कॉन्व्हेंट स्कूल

**१७ वर्षांखालील मुले :-**

१) यश पुजारी – होली मेरी कॉन्व्हेंट स्कूल
२) क्रिशांग पालवे – ऑल सेंट्स हायस्कूल
३) ऋषित देशमुख – होली मेरी कॉन्व्हेंट स्कूल
४) अर्णव बोरसे – ऑल सेंट्स हायस्कूल
५) आदित्यप्रसाद जोशी – देविका इंग्लिश मीडियम स्कूल

**१७ वर्षांखालील मुली :-**

१) शेनबागादेवी नाडर – लिओ इंटरनॅशनल स्कूल
२) रिषा खरबे – होली मेरी कॉन्व्हेंट स्कूल
३) नैत्रिषा आचार्य – श्रीमती एल. बी. जोशी इंग्लिश हायस्कूल
४) सान्वी शर्मा – युरो स्कूल, अप्पर ठाणे
५) प्राप्ती म्हात्रे – शुभम इंग्लिश मीडियम स्कूल

**१९ वर्षांखालील मुले :-**

१) राज अड्डापल्ली – श्री महादेव चौघुले महाविद्यालय, राहनाळ
२) तुषार सिंग – ग्लोबल इंग्लिश स्कूल, काल्हेर
३) सोहेल शेख – के.एम.ई.एस.स्कूल व ज्युनिअर कॉलेज

**१९ वर्षांखालील मुली :-**

१) हिंदवी प्रजापती – शारदा विद्यालय, शेलार

# गौरव महाराष्ट्राचा राज्यस्तरीय म्हसळा टाइम्सचा

## कुणबी चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजचे अध्यक्ष प्रेमनाथ ठोंबरे यांना उद्योग रत्न जाहीर

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१६, म्हसळा (रायगड) :** भोवडे गावचे सुपुत्र उद्योजक व समाज सेवक प्रेमनाथ ठोंबरे यांना दी म्हसळा टाइम्स यांच्यावतीने दिनांक ११ ऑक्टोबर २०२५ उद्योग रत्न पुरस्कार जाहीर तसेच मी उद्योजक होणारच या संस्थेच्यावतीने दिनांक १४ ऑक्टोबर २०२५ सन्मान घोषित करण्यात आलेले आहे. उद्योजक प्रेमनाथ ठोंबरे यांची माहिती आपल्या माहीत असेलच अगदी खूप गरीब घराण्यात जन्माला आलेले ठोंबरे आपल्या प्रत्येक कामामध्ये मेहनत घेऊन पुढे आलेले आहेत. घरामध्ये पुरेसे अन्न नाही. ५ भावंडे आणि आई - वडील असे त्यांचे कुटुंब, आई-वडील मोलमजूरी करून कसे बसे घर चालवत असत. काही वेळा घरात अन्न नसतांना फणसाचे गरे खावून दिवस काढायचे. आई-वडील यांनी त्याच्या ऐपती प्रमाणे शिक्षण दिले. जेव्हा मुलांचे खेळायचे दिवस होते तेव्हा



ते मोलमजुरी करत असतं. सकाळी शेतीची कामे करून शाळेत जायचे. शाळेतून येऊन पुन्हा शेतीची कामे करायची. सुट्टीच्या दिवशी गवताचे भारे विकायचे, कढीपत्ता विकायचा, लाकडाच्या मोळ्या विकायच्या. दहावी पर्यंत पायात चप्पल नाही. राहाण्यासाठी गवताचे घर. कसेतरी दहावी शिक्षण पूर्ण करून मुंबई शहरात आले आणि मागे वळून पाहीले नाही. नोकरीचा प्रवास १९८८ पासून हाऊसकिपर म्हणून चालू झाला आणि शेवट गृप जनरल मॅनेजर म्हणून. ०२ फेब्रुवारी २०१० नोकरी सोडून दिली. या नोकरीच्या दरम्यान अनेक पुरस्कार मिळाले. येथेच न थांबता २ फेब्रुवारी २०१० रोजी वन सोअर्स सर्व्हिस स्वतःची कंपनी चालू करून आज गेली १५ वर्ष मुंबईत आणि पुण्यात अतिशय उत्तम व्यावसाय करीत असताना देखील जुने दिवस न विसरता समाज कार्यास व्हाऊन घेतले

'ज्यांची बाग फुलून आली,
त्यांनी दोन फुले द्यावीत.
ज्यांचे सुर जुळून आले,
त्यांनी दोन गाणी गावी ।।

या उक्तीप्रमाणे बर्याच आश्रमाला म दतीचा हात पुढे केला.

काही शाळेना कॉम्पीटर भेट दिले. हे करत असतांना उत्कर्ष कुणबी संस्था, साखरपा-दाभोळे पंचक्रोशी चे कार्याध्यक्ष म्हणून काम करत आहेत तसेच गेल्या तीन वर्षांपासून कुणबी चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज, महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष म्हणून कार्यभार सांभाळत आहेत. आणि या संस्थेचे १८०० रजिस्टर उद्योजक असून संपूर्ण म हाराष्ट्रात ही संस्था काम करत आहे. तसेच या संस्थेच्या मार्फत २५० स्टॉल धारक उभे करण्यात आले आहेत. या संस्थेच्या मार्फत अनेक विक्री-प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे.

ज्या माध्यमिक विद्यालय किरबेट शाळेत त्यांनी शिक्षण घेतले त्याच शाळेच्या शैक्षणिक संस्थेमधे ते आज सदस्य आहेत. कै.डी. ए. जगताप आणि रुक्मिणी पांडुरंग पोटले चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या वतीने दि म्हसळा टाइम्स उद्योग रत्न या पुरस्कारासाठी आपली निवड केली आहे. तसेच मी उद्योजक होणारच या संस्थेच्या मार्फत आपणास १४ ऑक्टोबर २०२५ रोजी सन्मानित करण्यात येणार आहे.

# थोडक्यात

## सुपा परिसरात बिबट्या जेरबंद - आमदार दाते यांनी केली समक्ष पाहणी



**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.१६, सुपा (अहिल्यानगर) :** सुपा व परिसरात निर्माण झालेल्या बिबट्याच्या दहशतीला आळा घालण्याच्या प्रयत्नांत वनविभागाला दिनांक १६ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी मोठे यश मिळाले. जांभळवाडी ओढ्याजवळ लावलेल्या पिंजऱ्यात आज एक बिबट्या जेरबंद झाला. या प्रसंगी आमदार काशिनाथ दाते यांनी घटनास्थळी जाऊन समक्ष पाहणी केली व परिसरातील नागरिकांशी संवाद साधला. त्यांनी सांगितले की, एक बिबट्या पकडला गेला असला तरी परिसरात अजूनही इतर बिबट्यांचा वावर असण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी निर्धास्त न राहता खबरदारी घ्यावी. वनविभागाचे प्रयत्न व स्थानिकांच्या सहकार्यामुळे हा धोका काही प्रमाणात कमी झाला असला तरी सुरक्षिततेसाठी सतर्क राहणे गरजेचे असल्याचे आमदार दाते यांनी यावेळी स्पष्ट केले. याप्रसंगी सरपंच योगेश रोकडे यांच्या परीसरातील नागरिक मोठ्यासंखेने उपस्थित होते.

## नाशिक येथे राष्ट्रीय चर्मकार महासंघातर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा संपन्न



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१६, विंचूर (नाशिक) :** राष्ट्रीय चर्मकार महासंघ वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा राष्ट्रीय चर्मकार संघाचे संस्थापक व माजी समाज कल्याण मंत्री बबनराव घोलप यांच्या मार्गदर्शनाखाली शेवंता लॉन्स, नांदूर नाका, नाशिक येथे उत्साहात संपन्न झाला. प्रास्ताविकात चर्मकार संघाचे जिल्हाध्यक्ष श्रावण वाघ यांनी कार्यक्रमाची रूपरेषा, संघटनेच्या कार्याचा आढावा यावेळी सादर केला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे कार्याध्यक्ष समाजभूषण भानुदास विसावे होते. विसावे यांनी समाज संघटनाचे महत्व समजावून सांगितले. सर्व क्षेत्रात प्रगती साधता येईल. या ध्येयाने विद्यार्थी व समाज बांधवांनी कार्यरत राहिले पाहिजे. जाती - पोट जाती यावर लक्ष केंद्रित करण्यापेक्षा प्रगती कशी साधता येईल. यासाठी सर्वांनी मार्गक्रमण करावे. प्रदेशाध्यक्ष डॉ.शांताराम कारंडे यांनी विद्यार्थ्यांना करिअर करताना अभ्यास असो किंवा व्यवसाय असो मेहनतीतून यश संपादन करावे असे उपस्थितांना संबोधित केले.प्रमुख पाहुणे सहयोगी अधिष्ठाता कृषी महाविद्यालय धुळे यांनी तरुणांनी विविध लघुउद्योगांकडे वळावे यासाठी मार्गदर्शन केले. दत्तात्रय गोतिसे साहेबांनी कौटुंबिक सलोखा ठेवण्यासाठी मार्गदर्शन केले. एच.ए.एल चे जी.एम मा.चौधरी यांनी सदर समाजातील गुणवंतांचा गौरव करणे ही कौतुकास्पद बाब आहे असे सांगितले. प्रसंगी प्रदेशाध्यक्ष डॉ.शांताराम कारंडे (चित्रपट निर्माते व लेखक), राष्ट्रीय सचिव दत्तात्रय गोतीसे, वसंतराव बावीस्कर, डॉ.प्रशांत पाटोळे, बर्वे, सहयोगी अधिष्ठाता बबनराव इल्हे,संदीप सरवार, राज्य सचिव अनिल कानडे, मोहनशेठ पवार, संपर्क प्रमुख आनंदा महाले, प्रमोद नाथेकर, उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष प्रकाश पवार एच.ए.एल चे पदाधिकारी हितेंद्र सौंदानकर, युवा अध्यक्ष निकितेश धाकराव, नाशिक शहर उपाध्यक्ष संतोष धाकतोडे, नाशिक पूर्व अध्यक्ष अमित लोहकरे इ. पदाधिकारी उपस्थित होते. नाशिक जिल्ह्यातील गुणवंत विद्यार्थी व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी समाजातील दहावी, बारावी, पदवीधर गुणवंत विद्यार्थी, सेवानिवृत्त कर्मचारी, पदोन्नती झालेले कर्मचारी, पत्रकार, संघटनेचे पदाधिकारी आदींचा सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाचे सूत्रसंचलन संजय वाघ सर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नाशिक शहराध्यक्ष विष्णू लोहकरे, ग्रामीण जिल्हाध्यक्ष प्रदीप अहिरे, जिल्हा कार्याध्यक्ष अमोल म्हैसधुणे, जिल्हा सचिव दादा पठाडे, चर्मकार देवस्थान ट्रस्ट अध्यक्ष राजू सूर्यवंशी, नाशिक पश्चिम अध्यक्ष शरद पवार, साई अक्षदा विवाह मंडळ अध्यक्ष साहेबराव घोलप, गठई कामगार अध्यक्ष रामनाथ सरवार आदींनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रदीप आहिरे यांनी केले.

## शालेय जिल्हास्तरीय तायक्कांदो स्पर्धेत मंद्रूपचे यश



**अक्षराज : शिवराज मुगले**

**दि.१६, सोलापूर :** जिल्हास्तरीय शालेय तायक्कांदो स्पर्धेत मंद्रूपच्या दक्षिण सोलापूर तायक्कांदो अकॅडमीच्या खेळाडूंनी चमकदार कामगिरी करत विविध वजनी गटात तीन सुवर्णपदक पटकाविले. या विजेत्या खेळाडूंची पुणे येथे होणाऱ्या विभागीय शालेय तायक्कांदो स्पर्धे साठी निवड झाली आहे. क्रीडा व युवक सेवा संचालनालय पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाने जिल्हा क्रीडा परिषद सोलापूर व तायक्कांदो असोसिएशन सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय तायक्कांदो क्रीडा स्पर्धा घेण्यात आल्या. माळशिरस पिलीव स्वामी समर्थ मल्टीपर्पज हॉल येथे पार पडलेल्या विविध तालुक्याने भाग घेतला होता. या शालेय जिल्हास्तरीय स्पर्धेत दक्षिण सोलापूर तायक्कांदो अकॅडमी मंद्रूपच्या खेळाडूंनी चमकदार अशी कामगिरी केली.

**सुवर्णपदक खेळाडूंची नावे -**

अशी १७ वर्ष मुली ५२ ते ५५ किलो खालील वजन गटात पोर्णिमा खंदारे (सुवर्ण)१९ वर्ष. मुली ४६ ते ४९ वजनी गटात प्रतिभा राठोड (सुवर्ण), १७ वर्ष, मुले ५५ ते ५९ किलो वजन गटात अथर्व उंबर्जे (सुवर्ण) असे ३ सुवर्णपदक पटकाविले आहे.

सुवर्णपदक विजेत्या खेळाडूंची पुणे येथे होणाऱ्या विभागीय शालेय तायक्कांदो स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या यशस्वी खेळाडूंना दक्षिण सोलापूर तायक्कांदो मंद्रूप अकॅडमीचे मुख्य प्रशिक्षक शिवराज मुगळे यांचे मार्गदर्शन लाभले. तायक्कांदो अकॅडमी मंद्रूप अध्यक्ष प्रवीण जोडमोठे, रेश्मा राठोड, सचिन कुंभार, प्रिती राठोड, दिपक धुळखेडे, सिध्दाराम विजापूरे, नागनाथ धनाळे, शिवपुत्र म्हेत्रे, सुनील टेळे, विश्वनाथ घाटे, अरविंद राठोड यांनी अभिनंदन केले आहे. व विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.